घटना समितीतील प्रतिनिधित्व संप्रदायानुसार (१९४६) -- एकूण २९६ (२९२+४)

सर्वाधिक - हिंदू - १६३

मुस्लिम - ८०

अनुसूचित जाती - ३१

३१ डिसें १९४७ - राज्यनिहाय सदस्य =

भारतीय प्रांत २२९ (२२६+३)

संयुक्त प्रांत - ५५ सर्वाधिक नंतर मद्रास - ४९, बिहार - ३६

मुंबई - २१

पं. बंगाल - १९ मध्य प्रांत - १७

संस्थाने ७० - एकूण संस्थाने - २९

सर्वाधिक - म्हैसूर - ७

त्रावणकोर - ६

## घटक 3- राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट्ये

① सर्वात विस्तृत लिखित घटना :

१९४९ साली = सरनामा, २२ भाग, ३९५ कलमे व ८ परिशिष्टे.

२०१६ = सरनामा २५ भाग ४६५ कलमे व १२ परिशिष्टे.

१९५१ पासून ⟹ २० कलमे व एक भाग वगळला (सातवा)

९० कलमे व चार भाग (४ए, ९ए, ९बी, १४ ए)

चार परिशिष्टे (९, १०, ११, १२) समाविष्ट करण्यात आली.

अमेरिकन राज्यघटना लिखित तर ब्रिटिश अलिखित आहे.

② विविध स्त्रोतांकडून उसनवारी :

भारतीय राज्यघटनेची संरचना प्रामुख्याने भारत सरकार कायदा १९३५ वर.

③ परिदृढता आणि परिवर्तनीयता यांचा समन्वय :

ताठरही नाही आणि लवचिकही नाही. कलम ३६८ मध्ये घटना दुरुस्तीची पद्धती नमूद करण्यात आली आहे. ① संसदेच्या विशेष बहुमताने

② संसदेच्या विशेष बहुमता बरोबरच अर्ध्या राज्यांच्या संमतीने

तसेच साध्या बहुमताने दुरुस्त्या करता येतात.

④ एकात्मतेकडे झुकणारे संघराज्य :

संघराज्य ⟶ दोन सरकारे, अधिकारांची वाटणी, लिखित राज्यघटना, राज्यघटनेचे श्रेष्ठत्व, स्वतंत्र न्यायव्यवस्था, द्विगृही पद्धती.

एकात्म ⟹ प्रबळ केंद्रशासन, एकात्म राज्यघटना, एकेरी नागरिकत्व, एकात्मिक न्यायव्यवस्था, केंद्रातर्फे राज्यपालांची नियुक्ती, अखिल भारतीय सेवा, आणिबाणीची परिस्थिती.

Scanned by CamScanner

राज्यघटनेत संघराज्य ही संज्ञा वापरलेली नसून कलम १ मध्ये राज्याचा संघ म्हणून संबोधले आहे.

## ⑤ संसदिय पद्धतीची शासनव्यवस्था :

अमेरीका - अध्यक्षीय पद्धत.
ब्रिटन - संसदिय पद्धत.

संसदीय पद्धत - कार्यकारी विभाग व कायदेमंडळ यातील सहकार्य व समन्वय या तत्वावर आधारलेली असते. या पद्धतीलाच वेस्टमिनिस्टर पद्धतीचे सरकार, उत्तरदायी सरकार आणि मंत्रिमंडळाचे सरकार या नावाने ओळखली जाते.

भारतातील संसदीय पद्धतीत भारताचा राष्ट्रप्रमुख हा निवडून आलेला असतो
ब्रिटनमध्ये राष्ट्रप्रमुख वंशपरंपरागत असतो.

संसदीय शासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये :

1. नामधारी व प्रत्यक्ष कार्यकारी विभागाचे अस्तित्व
2. बहुमत असलेल्या पक्षाची राजवट
3. कार्यकारी विभाग विधिमंडळाला उत्तरदायी
4. पंतप्रधान व मुख्यमंत्री यांचे नेतृत्व
5. कनिष्ठ सभागृहाचे विसर्जन.

## ⑥ संसदेचे सार्वभौमत्व आणि न्यायव्यवस्थेचे श्रेष्ठत्व :

संसदेचे सार्वभौमत्व - ब्रिटिश तत्व हट }
न्यायव्यवस्थेचे श्रेष्ठत्व — अमेरिकन तत्व } याचा समन्वय.

* संसदेने केलेले कायदे घटनाबाह्य आहे असे सर्वोच्च न्यायालय म्हणू शकते.
* संसद कायदे करुन घटनेच्या भागात दुरुस्त्या करु शकते.

## ⑦ स्वतंत्र व एकात्मिक न्यायव्यवस्था :

एकात्मिक न्यायव्यवस्था

* सर्वोच्च न्यायालय अपिलासाठीचे उच्चतम न्याय.

सर्वोच्च स्थानी — सर्वोच्च न्यायालय (केंद्रस्तर)
|
उच्च न्यायालये (राज्यस्तर)
|
जिल्हा न्यायालये (जिल्हा स्तर)
|
कनिष्ठ न्यायालये

## ⑧ मूलभूत हक्क :

राज्यघटनेच्या भाग 3 मध्ये - मूलभूत हक्कांची हमी.

1) समानतेचा हक्क — कलम १४ ते १८
2) स्वातंत्र्याचा हक्क — कलम १९ ते २२
3) शोषणाविरुद्धचा हक्क — कलम २३-२४
4) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क — कलम २५-२८
5) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क — कलम २९-३०
6) घटनात्मक उपाययोजनेचा हक्क — कलम 32

Scanned by CamScanner

## ⑨ राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वे :

सामाजिक व आर्थिक लोकशाहीच्या आदर्शांना चालना देणे हे उद्दिष्ट :
कल्याणकारी राज्य स्थापन करण्यासाठी आवश्यकता .

## ⑩ मुलभूत कर्तव्ये

मूळ राज्यघटनेत मुलभूत कर्तव्यांची तरतुद नव्हती.
१९७५-७७ म्हणजेच अंतर्गत आणीबाणीच्या काळात स्वर्णसिंग समितीच्या शिफारशी नुसार १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीने घटनेचा भाग ४ ए वाढविण्यात आला त्यात ५१-ए हे एकच कलम असून त्यात १० कर्तव्यांचा समावेश केला. ८६ वी घटना दुरुस्ती २००२ नुसार एका कर्तव्याचा समावेश केल्यावर ती संख्या ११ झाली.
⇒ हक्कांचा उपभोग घेत असताना कर्तव्यांची पण जाणीव असावी असा त्यामागील हेतू .

## ⑪ धर्मनिरपेक्ष राष्ट्र

म्हणजे कोणताही धर्म भारताचा अधिकृत धर्म असणार नाही - सर्व धर्मांना समान सन्मान .
सन १९७६ च्या ४२ व्या दुरुस्तीने सरनाम्यामध्ये हा शब्द समाविष्ट केला.
तसेच मुलभूत हक्कामध्येही धर्मविषयक हक्कांचा समावेश.
सांप्रदायिक प्रतिनिधित्वाची पध्दत रद्द केली .

## ⑫ सार्वत्रिक प्रौढ मताधिकार

अठरा वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक नागरिकाला जात, धर्म, वंश, लिंग, साक्षरता, संपत्ती याच्या आधारे कोणताही भेदभाव न करता मतदान करण्याचा हक्क आहे.
⇒ ६१ वी घटनादुरुस्ती १९८८ - मताधिकाराची वयोमर्यादा - २१ वरून १८ वर्षे (कलम ३२६)
महिलांना मताधिकार अमेरीकेत १९२०, ब्रिटन १९२८, सोव्हिएत संघराज्य १९३६, फ्रान्स १९४५, इटली १९४८, स्विस - १९७०)

## ⑬ एकेरी नागरिकत्व :

स्वरूप संघराज्यीय असले तरी नागरिकत्व मात्र एकेरी म्हणजे भारतीय .
अमेरीकेत दुहेरी नागरिकत्व आहे . ① देशाचे ② राज्याचे

## ⑭ आणिबाणीविषयक तरतुदी .

राष्ट्रपतीस असाधारण परिस्थिती प्रभावीपणे हाताळता यावी यासाठी आणिबाणी .
प्रकार ③ ⟶ ① राष्ट्रीय आणीबाणी - (कलम ३५२)
② राज्यातील / घटनात्मक आणिबाणी (कलम ३५६)
③ आर्थिक आणिबाणी (कलम ३६०)

## ⑮ त्रिस्तरीय सरकार

सन १९९३ मध्ये ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती करून तिसऱ्या स्तराचा समावेश
① केंद्र ② राज्य ③ स्थानिक स्वराज्य संस्था (शहरी व ग्रामीण)

## ⑯ सहकारी संस्था

सन २०११ ⟶ ९७ वी घटनादुरुस्ती सहकारी संस्थांना घटनात्मक दर्जा व संरक्षण या संदर्भात तीन बदल करण्यात आले.

Scanned by CamScanner

12

① सहकारी संस्था स्थापन करण्याचा अधिकार मुलभूत अधिकार (कलम 19)
② सहकारी संस्थांना चालना देणे. (कलम 43 बी)
③ राज्यघटनेत सहकारी संस्था शीर्षकाचा नवीन भाग 9 बी चा समावेश.
④ बहुराज्यीय सहकारी संस्था – कायदे करण्याचा अधिकार संसदेला.
इतर सहकारी संस्था – राज्य विधिमंडळाला

## भारतीय राज्यघटनेचे स्त्रोत :

1) **भारत सरकार कायदा : 1935** : संघराज्यीय शासनपद्धती, राज्यपालांचे पद, न्यायव्यवस्था, लोकसेवा आयोग, आणिबाणीसंबंधी तरतुदी, प्रशासनिक तपशील.

2) **ब्रिटिश राज्यघटना** : संसदीय शासनपद्धती, कायद्याचे राज्य, कायदेमंडळ प्रणाली, एकेरी नागरिकत्व, आदेश (writs) पारित करण्याचे अधिकार संसदीय विशेषाधिकार, द्विगृही कायदेमंडळ.

3) **अमेरिकेची राज्यघटना** : मुलभूत अधिकार, स्वतंत्र न्यायव्यवस्था, न्यायिक पुनर्विलोकन, राष्ट्रपती विरुद्ध महाभियोग, सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या न्यायाधिशांची पदच्युती, उपराष्ट्रपती पद.

4) **आयर्लंडची राज्यघटना** – मार्गदर्शक तत्वे, राज्यसभेत नामनिर्देशीत सदस्य, राष्ट्रपतीच्या निवडणुकीची पद्धत.

5) **कॅनडाची राज्यघटना** : प्रबळ केंद्रसत्ता असलेले संघराज्य, केंद्राकडे शेषाधिकार, केंद्रातर्फे राज्यपालांची नेमणूक, सर्वोच्च न्यायालयाचे सल्लागारी अधिकारक्षेत्र.

6) **ऑस्ट्रेलियाची राज्यघटना** : समवर्ती सूची, व्यापार व वाणिज्य व्यवहाराचे स्वातंत्र्य, संयुक्त अधिवेशन

7) **जर्मनी - वायमर प्रजासत्ताक** : आणिबाणीच्या काळात मुलभूत अधिकारांचे निलंबन.

8) **सोव्हिएत युनियन राज्यघटना** – मुलभूत कर्तव्ये, सरनाम्यातील सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाचे आदर्श.

9) **फ्रान्सची राज्यघटना** : प्रजासत्ताकपद्धती, सरनाम्यातील स्वातंत्र्य, समता व बंधुता

10) **द. आफ्रिका राज्यघटना** : घटनादुरुस्तीची पद्धत, राज्यसभा सदस्य निवडणूक

11) **जपानची राज्यघटना** : कायद्याने स्थापित प्रक्रिया.

Scanned by CamScanner